

**देगलूर :** देगलूर महाविद्यालयातील रोजगार संधी कार्यशाळेत प्राचार्य डॉ. मोहन खताळ, राजा एन., निलेश भोसले, पवनकुमार सिंग आदी उपस्थित होते.

# देगलूर महाविद्यालयात रोजगार संधी कार्यशाळा

2/5/24

**देगलूर, ता. ६ (बातमीदार) :** देगलूर महाविद्यालयातील प्लेसमेंट विभाग व महाराष्ट्र बॉर्डर चेक पोस्ट नेटवर्क लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवसीय रोजगाराच्या संधी कार्यशाळेचे मंगळवारी आयोजन करण्यात आले होते.

अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. मोहन खताळ होते. त्यांनी नवीन धोरणानुसार विद्यार्थ्यांना रोजगाराभिमुख संधी उपलब्ध करून देणे गरजेचे असल्याचे मत यावेळी बोलताना व्यक्त केले. यावेळी महाराष्ट्र बॉर्डर चेक पोस्ट नेटवर्कचे राजा एन., निलेश भोसले, पवनकुमार सिंग उपस्थित होते. राजा एन. व निलेश भोसले यांनी कंपनीची भूमिका, कार्यप्रणाली व रोजगाराच्या संधीबाबतची माहिती दिली. कार्यशाळेस पदवी व पदव्युत्तर वर्गाचे विद्यार्थी उपस्थित होते. त्यांची बहुपर्यायी स्वरूपाची २० गुणाची परीक्षा व मुलाखत घेण्यात आली. प्रमुख पाहुणे म्हणून उपप्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. रत्नाकर लक्षटे यांनी, डॉ. सुरेश कासिदे यांनी आभार मानले. सुत्रसंचलन डॉ. संजय देबडे यांनी केले. यशस्वितेसाठी समन्वयक डॉ. रत्नाकर लक्षटे, डॉ. राजकुमार पोकलवार, किशन पांचाळ, गंगाधर मामिडवार, शाम कळसकर यांनी परिश्रम घेतले.

Scanned with OKEN Scanner